# जनसंपर्क अधिकारी

मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालय
रामनगर सृष्टी, मिरारोड पुर्व ता.जि.ठाणे
फोन नं. ०२२-२९४५१००१
Mail ID- pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in


प्रेसनोट क्रमांक ३२६-२२ दिनांक ०६/११/२०२२

## गुगल सर्च करताना सावधानता बाळगण्याबाबत मिरा- भाईंदर, वसई- विरार पोलीस आयुक्तालयातर्फे नागरिकांना आवाहन.

तंत्रज्ञानाच्या वापरामूळे अनेक व्यवहार नागरिक ऑनलाईन पध्दतीने करण्याकडे वळतात. सध्यस्थितीत विविध ॲप व वेबसाईटचा वापर नागरिक सर्रासपणे करत आहेत. सर्व सोशल प्लेटफॉर्मवर वेगवेगळया डिस्काऊंट स्किम, तात्काळ सेवा-सुविधा ग्राहकांना वितरीत केल्या जातात. या सुविधा घेत असताना पेमेंटकरीता वेगवेगळया कंपन्यांचे ॲप्स असून ते सुरक्षित मानले जाते.

दिवाळीच्या सनानंतर नागरिकांचे पर्यटनाचे हंगाम सुरु होत असतात. त्याकरीता हॉटेल बुकींग, विमानसेवा, खाणे तसेच बाहेरगावी चलन व्यवस्था अशा सुविधा मिळणेकरीता नागरिक ऑनलाईन चौकशी करीत असतात. त्यामूळे सायबर क्राईम करणाऱ्या आरोपीतांनी त्यांचे लक्ष हॉटेल बुकींग करणाऱ्या नागरिकांकडे वळविले आहे.

**फसवणूकीचा प्रकार :-**

१. सायबर चोरांनी गुगलवर खोटे हॉटेल/आस्थापनाचे नाव टाकून त्यासमोर त्यांचा मोबाईल नमूद केलेला असतो.
२. नागरिकांनी **Google Search** केल्यास असे क्रमांक दिसून येतात.
३. **Hotel Booking Charges, Flight Booking Charges, Currency Exchange**,राहणे – खाणे व इतर सुविधा देण्याचे सांगून पैसे उकळले जातात व पैसे मिळताच नंबर बंद करण्यात येतो.
४. अथवा सायबर चोरांकडून लिंक पाठविली जाते त्यामध्ये बँक खात्याचा तपशील भरल्यास ॲप्लीकेशन डाऊनलोड करण्यास सांगून कोड मागविला जातो व पैसे बँकेतून काढून घेतले जातात.

**घ्यावयाची काळजी :-**

- **Online Booking** करताना संकेतस्थळावरील क्रमांक तपासावा.
- खात्री झाल्याशिवाय कोणताही आर्थिक व्यवहार करु नये.
- कोणत्याही अज्ञात **Link, QR Code** स्कॅनरवर क्लिक करु नका, ऑनलाईन फसवणुक करणारे हे तंत्र खुप वापरतात.
- मोबाईलचा ताबा घेईल असे **Screen Application (Anydesk,Team viewer)**डाऊनलोड करु नये.
- हॉटेल बुकींग करताना अधिकृत संकेतस्थळाचा वापर करावा.
- काही झाले तरी आपला ओटीपी किंवा इतर कोणताही पिन क्रमांक देवू नये.

तरी सायबर गुन्हे कक्ष, मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालयातर्फे मिरा-भाईंदर, वसई-विरार शहरातील नागरिकांना अशा प्रकारे होणाऱ्या फसवणूकीबाबत सतर्क राहणेबाबत जाहिर आवाहन करण्यात येत आहे. तसेच अशा प्रकारे कोणत्याही इसमाची फसवणूक झाल्यास तात्काळ नजीकच्या पोलीस ठाणेस, सायबर गुन्हे कक्षास संपर्क साधावा. तसेच www.cybercrime.gov.in अथवा १९३० या हेल्पलाईनवर संपर्क साधून तक्रार द्यावी.

-----oooo-----